महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी प्रसिध्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण १०१५/प्र.क्र.३६०/प्रशासन-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
तारीख: १४ सप्टेबर, २०१५

वाचा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५), दिनांक २८.४.२०१५.

प्रस्तावना

सार्वजनिक जीवनातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रांच्या शाश्वत विकासासाठी सुप्रशासन अत्यावश्यक आहे. प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व व प्रतिसादशीलता हे सुप्रशासनाचे तीन अत्यावश्यक घटक आहेत. जनता व प्रशासन यामधील संबंध सुधारण्यासाठी व ते बळकट करण्यासाठी, प्रशासनामध्ये जबाबदारी, उत्तरदायित्व व पारदर्शकता आणणे आवश्यक आहे. विहित कालमर्यादेत लोकसेवा देण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ दिनांक २८.४.२०१५ रोजी राज्यात लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम ३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत या अध्यादेशाखाली पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवांबाबतचा तपशील अधिसूचित करणे आवश्यक आहे. यामध्ये विभागाद्वारे पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, त्या देण्यासाठी जबाबदार पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि सेवा पुरविण्यासाठीची विहित कालमर्यादा घोषित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे.

२. या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील विमा संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय व विक्रीकर विभाग यांचेकडून वेगवेगळया सेवा पुरविण्यात येतात. त्यामधील ज्या सेवा महत्वपूर्ण आहेत अशा सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ मधील कलम ३ नुसार अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव विभागाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेली १ सेवा संचालक, विमा संचालनालय यांचे कार्यालयामार्फत तात्काळ अधिसूचित करावी.

२) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या २ सेवा संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय यांचे कार्यालयामार्फत तात्काळ अधिसूचित करावी.

३) या शासन निर्णयाच्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या ४ सेवा आयुक्त, विक्रीकर विभाग यांचे कार्यालयामार्फत तात्काळ अधिसूचित कराव्या.

४) अध्यादेशातील तरतूदीनुसार उपरोक्तनुसार सेवा अधिसूचित केल्यानंतर या सेवा देण्यास जबाबदार पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिसूचित केलेल्या सेवा पुरविण्याची जबाबदारी राहील.

५) या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ, ब व क मध्ये नमूद केलेल्या सेवांमध्ये अथवा सेवा पुरविण्याकरिता आकारावयाची फी, विहित नमुना, आवश्यक कागदपत्रे व सेवा पुरविण्याची कालमर्यादा, तसेच या सेवा देण्यासाठी पदनिर्देशित करण्यात आलेले अधिकारी, प्रथम अपील अधिकारी व द्वितीय अपील अधिकारी इत्यादींमध्ये संबंधित कार्यालय प्रमुखांना/विभाग प्रमुखांना शासनाच्या मान्यतेने सुधारणा करता येतील.

६) उपरोक्तनुसार सेवा अधिसूचित करण्यात आल्यानंतर या लोकसेवांची सूची, विहित कालमर्यादा, विहित अर्ज व नमुने, सेवेसंदर्भातील शुल्क, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी यांचा तपशिल कार्यालयाच्या सूचना फलकावर तसेच त्यांच्या संकेतस्थळावर किंवा पोर्टलवर प्रदर्शित करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०९१४१५५६०४०१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinay Dattatray Athavale

Digitally signed by Vinay Dattatray Athavale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3021b70f581cdf609b74f09b846df11e4abfb2e29aa1f3b67c8a25f414b0732e, cn=Vinay Dattatray Athavale
Date: 2015.09.14 15:59:20 +05'30'

(वि.द. आठवले)
उपसचिव, वित्त विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव(वित्त)/प्रधान सचिव(व्यय)/प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा)/सचिव(लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. आयुक्त, अल्पबचत व राज्य लॉटरी संचालनालय, मुंबई.
९. संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई.
१२. सर्व सह/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वित्त विभाग,
१३. नोडल अधिकारी (लोकसेवा हक्क), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
१३. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवडनस्ती (प्रशासन-१)

परिशिष्ट-अ

अ. क्र.	लोकसेवेचे नांव	लोकसेवा पुरविण्यासाठची कालमर्यादा (कामकाजाचे दिवस)	अर्जाचा विहित नमुना व (असल्यास) शुल्क	पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपील प्राधिकारी	द्वितीय अपील प्राधिकारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
(१)	नविन विमा जोखीम स्विकारणे अ)विमा संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्धअसलेल्या विहित अर्जान्वये परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यावर प्रस्तावांची छाननी करणे व विमा हप्त्याची रक्कम अर्जदारास कळविणे (विविध विमा प्रकरणासाठी विहित नमुन्यातील संपूर्ण भरलेले विमा प्रस्ताव पत्र तसेच आवश्यक ती जोडपत्रे प्राप्त झाल्यानंतर)	८ दिवस	नि:शुल्क	संबंधित कनिष्ठ तांत्रिक अधिकारी	संबंधित सहायक विमासंचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्रराज्य, गृहनिर्माणभवन (म्हाडा),२६४, पहिलामजला, कलानगरसमोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१	उप विमा संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्रराज्य, गृहनिर्माणभवन (म्हाडा), २६४, पहिलामजला कलानगरसमोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

परिशिष्ट-ब

अ. क्र.	लोकसेवेचे नांव	लोकसेवा पुरविण्यासाठची कालमर्यादा (कामकाजाचे दिवस)	अर्जाचा विहित नमुना व (असल्यास) शुल्क	पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपील प्राधिकारी	द्वितीय अपील प्राधिकारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
(१)	मासिक निवृत्तीवेतन/ कुटुंबनिवृत्तीवेतन	महिन्याच्या पहिल्या दिवशी निवृत्तीवेतनधारकांचे बँक खात्यात मिळू शकेल.(फक्त माहे एप्रिल सोडून)	नाही	अप्पर कोषागार अधिकारी/ सहाय्यक अधिदान व लेखा अधिकारी (जिल्हानिहाय यादी स्वतंत्र जोडलेली आहे.)	जिल्हा कोषागार अधिकारी/अधिदान व लेखा अधिकारी (जिल्हानिहाय) एकूण ३४	सहसंचालक, लेखा व कोषागारे, महसुली विभागनिहाय/ संचालक, लेखा व कोषागारे
(२)	मुद्रांक वितरीत करणे.	चलन भरणा पडताळणीचा कालावधी धरुन दोन दिवस	नाही	अप्पर कोषागार अधिकारी (जिल्हानिहाय यादी स्वतंत्र जोडलेली आहे.)	जिल्हा कोषागार अधिकारी (जिल्हानिहाय) एकूण ३४	सहसंचालक, लेखा व कोषागारे, महसुली विभागनिहाय

परिशिष्ट-क

अ. क्र.	लोकसेवेचे नांव	लोकसेवा पुरविण्यासाठची कालमर्यादा (कामकाजाचे दिवस)	अर्जाचा विहित नमुना व (असल्यास) शुल्क	पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपील प्राधिकारी	द्वितीय अपील प्राधिकारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
(१)	**ई-नोंदणी**					
	१) इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन नोंदणी अर्जाचे नमुने विभागाच्या www.mahavat. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे.	सेवा तात्काळ (२४x७)	इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन अर्जाचा नमुना विभागाच्या www.mahavat. gov.in या संकेतस्थळावर नि:शुल्क उपलब्ध.	विक्रीकर अधिकारी नोंदणी	नोदंणी अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.	नोदंणी अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.
	२) नोंदणी अर्ज स्वीकारणे	परिपुर्ण, वैध, आणि चुकांमुक्त अर्ज विभागाच्या www.mahavat. gov.in या संकेतस्थळावर इलेक्ट्रॉनिकली स्विकारण्यात येऊन तात्काळ पोचपावती देण्यात येते. सेवा तात्काळ (२४x७)	अ) मुल्यवर्धित कर कायद्यांतर्गत रुपये ५००/- इतके ई-शुल्क (उलाढालीची विहीत मर्यादा पुर्ण केलेल्याप्रकरणांत) * केंद्रिय विक्रीकर कायद्यांतर्गत रुपये २५/- इतके ई-शुल्क * मुल्यवर्धित कर कायद्यांतर्गत स्वेच्छा नोंदणीसाठी रुपये ५०००/- इतके ई-शुल्क ब) सुरक्षा ठेव रुपये २५०००/- इतके ई-शुल्क (मुल्यवर्धित कर कायद्यांतर्गत स्वेच्छा नोंदणीसाठी)	विक्रीकर अधिकारी, नोंदणी	परिपूर्ण, वैध आणि चुकामुक्त अर्जच फक्त संकेतस्थळावर स्विकारले जातात त्यामुळे उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज स्विकाले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.	परिपूर्ण, वैध आणि चुकामुक्त अर्जच फक्त संकेतस्थळावर स्विकारले जातात त्यामुळे उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज स्विकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.

	३) अर्ज सर्व दृष्टीने परिपुर्ण असेल तर नोंदणी दाखला क्रमांक देणेबाबत	परिपुर्ण, वैध, आणि चुकांमुक्त अर्ज असल्यास तपासणीअंती ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत (तपासणी कालावधी धरून) नोंदणी दाखला क्रमांक दिला जाईल. नोदंणी क्रमांक नाकारला तर कारणासह अर्जदारास याबाबत ७ दिवसात ई-मेल व्दारे कळविण्यात येते.	नि:शुल्क	विक्रीकर अधिकारी, नोंदणी	अर्ज परिपूर्ण, वैध चुकांमुक्त असल्यास System Generated नोंदणी क्रमांक विहित मुदतीत निर्माण केला जातो. त्यामुळे त्याविरुध्द अपिलाची आवश्यकता नाही. मात्र सेवा उल्लेखीत कालावधीत प्राप्त झाली नाही तर पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी.
२)	**ई-केंद्रीय विक्रीकर वैधानिक नमुने**					
	१)ई-केंद्रीय विक्रीकर कायद्या अंतर्गत वैधानिक नमुने मिळण्या साठीच्या अर्जाचे नमुने विभागाच्या www.mahavat. gov.in या संकेतस्थळा वर उपलब्ध करणे.	सेवा तात्काळ (२४x७)	नि:शुल्क	विक्रीकर अधिकारी, मध्यवर्ती भांडार कक्ष	नोदंणी अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.	नोदंणी अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही.
	२) ई-केंद्रीय विक्रीकर कायद्या अंतर्गत वैधानिक	परिपुर्ण, वैध, तपासलेला आणि चुकांमुक्त अर्ज विभागाच्या www.mahavat.	नि:शुल्क	विक्रीकर अधिकारी, मध्यवर्ती भांडार कक्ष	परिपूर्ण, वैध आणि चुकामुक्त अर्जच फक्त संकेतस्थळावर स्विकारले जातात	परिपूर्ण, वैध आणि चुकामुक्त अर्जच फक्त संकेतस्थळावर स्विकारले जातात

	नमुन्यांच्या पुरवठया साठी आवश्यक असलेल्या अर्जाचा स्वीकार करणे व पोचपावती देणे.	gov.in या संकेतस्थळावर इलेक्ट्रॉनिकली स्विकारण्यात येऊन तात्काळ पोचपावती देण्यात येते.सेवा तात्काळ (२४x७)			त्यामुळे उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज System कडून स्विकाले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.	त्यामुळे उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज System कडून स्विकाले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही.
	३) व्यापाऱ्यास त्यांच्या Email ID वरती Digitally Singnature केलेले वैधानिक नमुने उपरोक्त २(२) नुसार केलेल्या तपशीलाच्या अनुषंगाने उपलब्ध करून देणे.	परिपुर्ण, वैध, तपासलेला आणि चुकांमुक्त अर्ज असल्यास तपासणीअंती (तपासणी कालावधी धरुन) ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत विभागातर्फे व्यापाऱ्याला देण्यात आलेल्या लॉगीन आयडीवर पाठविण्यात येतील	नि:शुल्क	विक्रीकर अधिकारी, मध्यवर्ती भांडार कक्ष	अर्ज परिपूर्ण, वैध चुकांमुक्त असल्यास System Generated Digitally Singnature केलेले वैधानिक नमुने विहित मुदतीत अपलोड केले जातात . त्यामुळे त्याविरुध्द अपिलाची आवश्यकता नाही. मात्र सेवा उल्लेखीत कालावधीत प्राप्त झाली नाही तर पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी	प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी.
३)	**ई-विवरणे**					
	१) महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर कायदा, २००२ व केंद्रीय विक्रीकर कायदा, १९५६ या कायद्या अंतर्गत ई विवरण	तात्काळ (२४ x ७)	नि : शुल्क	ह्या सेवेत काही अडचणी आल्यास व्यापारी मदत कक्षाचे helpdesk@mahavat.gov.in या ई-मेलवर तक्रार नोदंवू शकतात तद्नंतर पदनिर्देशित अधिकारी (विक्रीकर उपायुक्त , सहायक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी)	पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी.	रकाना ६ मध्ये नमुद नियंत्रक अधिकाऱ्याचे लगतचे वरीष्ठ अधिकारी.

	पत्रांचे नमुने विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करणे.			यांचे मार्फत सदर तक्रारींचे निवारण केले जाते.		
	२) विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर दाखल झालेल्या ई-विवरण पत्रांची स्विकृती पश्चात पोचपावती उपलब्ध करणे.	ई- विविरणपत्रे अपलोड झाल्यानंतर लगेचच.	१) विहीत वेळेत ई-विवरणपत्र दाखल केल्यास नि:शुल्क. २) ई- विवरणपत्रे विहित कालावधी पासून १ महिन्याच्या आत दाखल केल्यास रू. १०००/- एवढे शुल्क लागू आहे. ३) विहित मुदतीपासून १ महिन्यानंतर ई-विवरणपत्रे दाखल केल्यास रु. ५०००/- एवढे शुल्क लागू आहे.	परिपूर्ण, वैध व चुकामुक्त असलेलीच विवरणपत्रके विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड केली जातात. ह्या सेवेत काही अडचण आल्यास व्यापारी विभागाच्या मदत कक्षाचे helpdesk@mahavat.gov.in या ई-मेलवर तक्रार नोंदवू शकतात तद्नंतर पदनिर्देशित अधिकारी (विक्रीकर उपायुक्त , सहायक विक्रीकर आयुक्त व विक्रीकर अधिकारी) यांचे मार्फत सदर तक्रारींचे निवारण केले जाते.	पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी.	रकाना ६ मध्ये नमुद नियंत्रक अधिकाऱ्याचे लगतचे वरीष्ठ अधिकारी.
४)	**ई-करभरणा**					
	१) महाराष्ट्र कोषागार नियम ६ नुसार चलनाचा नमुना व्यापारी त्याचा लॉग ईन आईडी व पासर्वड वापरून विभागाच्या www.mahavat.gov.in	सेवा तात्काळ (२४ x ७)	नि:शुल्क	व्यापाऱ्याला ह्या सेवेत काही अडचण आल्यास मदत कक्षाच्या ई-मेलवर helpdesk@mahavat.gov.in तक्रार नोंदविण्यात येते तक्रारीचे निवारण प्रकरणांच्यानुसार खालील अधिकाऱ्यांमार्फत हि केले जाते. १) विवरण व वसुली शाखा ह्या शाखेत काम	पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी.	पदनिर्देशित नियंत्रक अधिकारी.

	संकेतस्थळा वर भरणे व E-Payment करणे.			करणारे सर्व विक्रीकर अधिकारी व सहाय्यक विक्रीकर आयुक्त. २) नविन नोंदणी पाठपुरावा शाखेत काम करणारे विक्रीकर अधिकारी व सहाय्यक विक्रीकर आयुक्त. ३) मोठे करदाते शाखेत काम करणारे अधिकारी		

कार्यालयाचे पदनाम / पत्ता व दुरध्वनी क्रमांक

१	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, ठाणे	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, ठाणे ४०० ६०१. फोन : ०२२-२५३४११६२
२	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,पालघर	जिल्हा कोषागार कार्यालय, तळमजला, सुर्या कॉलनी वसाहत, बीडको रोड, पालघर (पश्चिम) ४०१ ४०४ फोन : ०२५२५-२५५५९९
३	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,रायगड	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, रायगड (अलिबाग) ४०२ २०१. फोन : ०२१४१- २२२०९२
४	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,रत्नागिरी	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, रत्नागिरी ४१५ ६१२. फोन : ०२३५२- २२२३३४.
५	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,सिंधुदूर्ग	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, ओरस, सिंधुदूर्ग ४१६ २२०. फोन : ०२३६२- २२८८४१.
६	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,पुणे	जिल्हा कोषागार कार्यालय, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, पुणे ४११ ००१ फोन : ०२०- २६११४७१५ / २६१२१२१४ / २६१२१२१५
७	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,सातारा	जिल्हा कोषागार कार्यालय, सातारा राजवाडा बिल्डिंग, सातारा ४१५ ००१. फोन : ०२१६२- २८४२४३.
८	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,सांगली	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, सांगली ४१५ ४१६ फोन : ०२३३-२३७६५५.
९	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,सोलापूर	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, सोलापूर ४१३ ००१ फोन : ०२१७-२७३१०३६..
१०	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,कोल्हापूर	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, कोल्हापूर४१६ ००१ फोन : ०२३१-२६४४४०७.
११	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,औरंगाबाद	लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, औरंगाबाद ४३१ ००१. फोन : ०२४०-२३२२१६९.

१२	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,परभणी	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, परभणी ४३१ ४०१ फोन : ०२४५-२२२०११५.
१३	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,बीड	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बीड ४३१ १२२. फोन : ०२४४-२२२२२७०
१४	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,नांदेड	जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, नांदेड ४३१ ६०१. फोन : ०२४६२- २३५२१७.
१५	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,उस्मानाबाद	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, उस्मानाबाद. ४१३ ५०१ फोन : ०२४७२-२२२२३२.
१६	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,जालना	कचेरी रोड, जुने जालना, जालना ४१३ ५१२. फोन : ०२४८२-२२३५८४.
१७	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,लातूर	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, लातूर ४१३ ५१२. फोन : २३८२२४५१९६.
१८	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,हिंगोली	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, हिंगोली ४३१ ५१९ फोन : २४५६२२१४४०
१९	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,नागपूर	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, नागपूर ४४० ००१. फोन : ७१२२५६१८४४/ २५६४९९८/ २५६१९७७.
२०	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,वर्धा	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा ४४२ ००१. फोन : ०७१५२-२४२०४३
२१	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,भंडारा	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, भंडारा ४४१ ९०४ फोन : ०७१८४-२५१७५४.
२२	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,चंद्रपूर	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, चंद्रपूर ४४२ ४०१. फोन : ०७१७-२०२७३.
२३	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,गडचिरोली	जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, गडचिरोली ४४२ ६०५. फोन : ०७१३२-२२२८२२.
२४	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,गोंदिया	जिल्हा कोषागार कार्यालय, गोंदिया ४४१ ६१४. फोन : ०७१८२-२२६८५०.

२५	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,अमरावती	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अमरावती ४४४ ६०१. फोन : ०७२१-२६६२२४३
२६	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,अकोला	जिल्हा कोषागार कार्यालय, अकोला ४४४ ००१. फोन : ०७२४-२४२१६८८.
२७	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,बुलढाणा	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, बुलढाणा ४४३ ००१. फोन : ०७२६-२२४२४१६.
२८	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,यवतमाळ	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, यवतमाळ ४४५ ४०१. फोन : ०७२३-२२४२९८४.
२९	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,वाशिम	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वाशिम ४४४ ५०५. फोन : ०७२५-२२३२४३९.
३०	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,नाशिक	जिल्हा कोषागार कार्यालय, लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, नाशिक ४२२ ००१. फोन : ०२५३-२५८०८७९/ २५७२२९६
३१	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,धुळे	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, धुळे ४२४ ००१. फोन : ०२५६-२२२३७९९६.
३२	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,जळगाव	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जळगाव ४२५ ००१. फोन : ०२५७-२२२९७१०.
३३	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,अहमदनगर	जिल्हा कोषागार कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, अहमदनगर ४१४ ००१. फोन : ०२४१-२३४५४४५.
३४	अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय,नंदूरबार	जिल्हा कोषागार कार्यालय, हाथ दरवाजा वसाहत, तहसिलदार कार्यालयाजवळ, नंदूरबार ४२५ ४१४.. फोन : ०२५६४-२२२००८.
३५	सहाय्यकअधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई	अधिदान व लेखा कार्यालय, लेखाकोष भवन, ए विंग, वांद्रे -कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई ४०० ०५१. दू.क्र. : ०२२-२६५९२२९३/९४